प्रतिवादी तर्फे साक्षीदार क्र.३

**पुढील सरतपास प्रतिवादीतर्फे वकील श्री. पी.एल. नरहरे यांचेमार्फत शपथेवर सुरु.**

१. अंतेश्वर मल्लेशा यांनी अंगद पाटील यांच्याकडून जी जमीन खरेदी केली आहे, त्याचे खरेदीखत दाखवल्यास मी ओळखु शकतो. आता मला जे खरेदीखत दाखवण्यात आले, ते तेच असून त्यातील मजकूर बरोबर आहे व त्यावर लिहून देणार म्हणून अंगद पाटील यांची व साक्षीदार म्हणून माझी सही आहे. त्यास **नि.क्र.१२०** देण्यात येत आहे. त्यावेळी मी सही करत होतो. सध्या माझ्या हाताला लकवा आल्यामुळे शपथपत्रावर अंगठ्याचे निशाण केले आहे.

**उलटतपास वादीतर्फे वकील श्री. एच. व्ही. गायकवाड यांचेमार्फत शपथेवर सुरु.**

२. मला खरेदीखताचा नंबर आठवत नाही. सदर खरेदीखत किती तारखेला झाला हे आठवत नाही. खरेदीखतावरील रक्कम रु.१७,०००/- अंगद पाटील यांच्या घरी अंतेश्वर यांनी दिली होती. सदर ठरावाच्यावेळी रु.१,०००/- दिली होती व माझ्यासमक्ष रु.१६,०००/- दिली होती. ठरावानंतर किती दिवसांनी खरेदीखत झाले होते हे मला आठवत नाही. ठरावपत्रावर देखील माझी सही आहे. मुळ ठरावपत्र कोणाच्या ताब्यात आहे हे मला माहीत नाही. सदर खरेदीखत कोणत्या जमिनीसंदर्भात झाले आहे हे मला आठवत नाही. खरेदीखतातील रक्कम कोणत्या कोणत्या ठिकाणी कुठे दिले आहे हे खरेदीखतामध्ये लिहीले आहे किंवा नाही हे मला आठवत नाही. खरेदीखतावरील जमिनीची चतुःसीमा मला सांगता येणार नाही. सदर जमीन कोणत्या कारणासाठी विक्री केली आहे याबाबत खरेदीखतावर लिहीले आहे किंवा नाही हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासमक्ष कोणतेही खरेदीखत झाले नाही व त्यावर मी सही देखील केलेली नाही.

३. अंतेश्वरच्या पत्नीचे नाव व गाव मला माहीत नाही. अंतेश्वरच्या पत्नीच्या भावाचे नाव देखील मला माहीत नाही. अंतेश्वरच्या पत्नीला किती भाऊ आहेत व त्यांना किती जमीन आहे हे मला माहीत नाही. अंतेश्वर यांना सासरवाडीची जमीन मिळाली आहे. त्यांना किती व कोणती जमीन मिळाली आहे याबाबत मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, खरेदीखतावरील व्यवहाराबद्दल मला माहिती नाही. अंतेश्वरचे पूर्ण नाव मला माहीत नाही. खरेदीखतावर मी कोणत्या तारखेला सही केली हे आठवत नाही. सदर खरेदीखत किती तारखेला लिहीण्यात आले होते हे मला आठवत नाही, परंतु सन १९८१-१९८२ साली झाले होते. सदर खरेदीखत

कोणी टाईप केले होते हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर खरेदीखतावर माझे फक्त नाव लिहीले आहे, सही नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला सही करायला येत नाही. सदर जमीन घेण्याअगोदर अंतेश्वरने जमीन खरेदी केली होती किंवा नाही हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, अंतेश्वरने पत्नीच्या माहेरहून जमीन खरेदी रक्कम आणली होती हे मी ऐकीव माहितीच्या आधारे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, अंतेश्वरच्या सांगण्यावरुन मी सदर शपथपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा असून आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण. फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

दि.१०/१०/२०२४

(**श्रीमती. व्ही. डी. भोसले**)
सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, निलंगा.